Publication: Vrittamanas
Date: 1/3/2020
Page: 8
Column: 1-5



# अदाणी डहाणू थर्मल पॉवर स्टेशनचा 'बॉलयर इंडिया 2020' मध्ये 'बेस्ट बॉयलर युजर'

डहाणू

कामगार विभागाच्या १५० वर्षपूर्तीला साजरे करण्यासाठी स्टीम बॉयलर संचालनालय, कामगार विभाग, महाराष्ट्र सरकारने 'बॉयलर इंडिया २०२०' पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले. कार्यक्रमामध्ये सर्वोत्तम स्थापित व उद्योन्मुख व्यवसाय सितारे व व्यक्तींच्या यशस्वी कामगिरीचा सन्मान करण्यात आला. आम्हाला सांगताना आनंद होत आहे की, 'अदाणी डहाणू थर्मल पॉवर स्टेशनला बॉयलर्सच्या प्रभावी वापराच्या माध्यमातून कार्यक्षम कार्यसंचालनांसाठी 'बेस्ट बॉयलर युजर' विभागांतर्गत पहिला पुरस्कार मिळाला आहे.

एडीटीपीएस (अदाणी डहाणू थर्मल पॉवर स्टेशन) बॉयलरची कार्यक्षमता व विश्वसनीयतेमुळे विजयी ठरले. कंपनीच्या बॉयलरने २५ वर्षांच्या दीर्घकालीन वापरानंतर देखील निकामी होण्याचे कमी प्रमाण व उच्च कार्यक्षमता दाखवली. नेहमीच्या कार्यसंचालनांसह एडीटीपीएसने आसपासच्या गावांमध्ये अनेक सामुदायिक उपक्रम देखील राबवले, जसे गावांच्या सुरक्षिततेसाठी फिल्ट्रेशन युनिट्सची सुविधा, कूपनलिकांचे (बोअरवेल) बांधकाम, मुलांसाठी शालेय सामग्रीचे दान, मासेमारी करणाऱ्यांसाठी जाळे आणि वैद्यकीय शिबीरे. एडीटीपीएसला यापूर्वी देखील अनेक पुरस्कार मिळाले आहेत. त्यामधून प्रेरणा घेत प्लाण्टमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या जागतिक दर्जांमुळे एडीटीपीएसला 'बॉयलर इंडिया २०२०' पुरस्कार सोहळ्यामध्ये 'बेस्ट बॉयलर युजर' विभागांतर्गत पहिला पुरस्कार पटकावण्यामध्ये मदत झाली. निवड व मूल्यांकन प्रक्रियेच्या निकषामध्ये सुरक्षा, हरित सोल्यूशन्स, तंत्रज्ञान, मान्यता व सामुदायिक कल्याण अशा क्षेत्रांचा समावेश होता. ऑन-साइट भेट आणि सर्व घटकांचे मूल्यांकन करत १५० अर्जदारांमधून पुरस्कार विजेत्यांची यादी निश्चित करण्यात आली.

कामगार व अबकारी विभाग मंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते 'बॉयलर इंडिया 2020'चे उदघाटन




या कार्यक्रमामध्ये वीज, साखर, कॅप्टिव्ह/को-जनरेशन, राइस मिल/साइझिंग, रसायने व कापड या सहा विभागांमधील उत्पादक, सेवा प्रदाता व व्यावसायिकांचा समावेश दिसून आला. क्षेत्रातील अनेक मोठमोठ्या कंपन्यांनी त्यांची तंत्रज्ञाने दाखवली, ज्यामध्ये हिटिंग व कूलिंग उपकरण, टर्नकी पॉवर प्लाण्ट्स, वेस्ट हिट रिकव्हरी युनिट्स, सांडपाण्याचे पुनर्चक्रण आणि जल व सांडपाणी व्यवस्थापनासाठी यंत्रणा, वायू प्रदूषण नियंत्रण आणि कामगिरी सुधारणारी रसायने इत्यादींचा समावेश होता.

महाराष्ट्र राज्यातील मुंबई येथील स्टीम बॉयलर्सचे संचालक धवल पी. अंतापूरकर आणि मुंबईतील स्टीम बॉयलर्सचे उपसंचालक जी.डी. वानखेडे यांच्या हस्ते एडीटीपीएसच्या कंपनी अधिकाऱ्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.